Vol 6 Issue 3 April 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

लैंगिकता व पौगंडावस्थेतील महाविद्यालयीन युवकांच्या वर्तणुकीतील बदल

प्रदीप आर. भानसे
एस.एस.जे.कॉलेज अर्जुनी/मोर. जि. गोंदिया .

सारांश :-

पौगंडावस्थेत महाविद्यालयीन युवकांच्या वर्तनात अनेकांगी स्वरुपाचे बदल होतात. या अवस्थेत लैंगिक भावना प्रभावित झाल्याने त्यांच्यावर सतत तणाव व दडपण आल्यासारखे त्यांना वाटते. लैंगिक विषयाच्या संदर्भात आपल्या समाजात उघडपणे बोलल्या जात नाही. त्यामुळे ते समवयस्क मित्र, चित्रपट, मासिके, ब्लूफिल्म, टी. व्ही. यामधून लैंगिक विषयावरील माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतात. बऱ्याचदा ही माहिती चुकीची असते. चुकीची माहिती त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी घातक असते. पौगंडावस्थेत लैंगिकतेच्या संदर्भात कोणत्या स्वरुपाचे बदल त्यांच्या वर्तणूकीत होतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधन पेपरच्या माध्यमातून करण्यात आला.

पौगंडावस्थेचा काळ हा 12–13 वर्षापासून साधारणपणे 19–20 वर्षापर्यंतचा समजला जातो. 18 वर्षानंतर मुले–मुली जेव्हा उच्च शिक्षणासाठी घराबाहेर पडतात तेव्हा त्यांचा संबंध बाहेरील जगाषी व त्यासोबतच लैंगिक बाबीशीही येतो. त्यांच्यात शारीरिक, मानसिक व भावनिक बदल होऊन लैंगिक प्रेरणा प्रभावी होऊ लागतात. त्यामुळे विरुद्ध लिंगी व्यक्तींबद्दल, समवयस्क मित्रांबद्दल प्रेम, आकर्षण निर्माण होते. ''पौगंडावस्थेत समवयस्क तरुण हे पौगंडावस्थेतील तरुणाच्या लैंगिक वर्तनावर परिणाम करतात. मुलींच्या बाबतीत साधारणतः असे दिसून येते की, पालक पौगंडावस्थेतील मुलींच्या स्वातंत्र्यांवर बंधने आणतात. त्यांच्यावर नवीन प्रमाणके लादली जातात. मुलींना बऱ्याचदा आई–वडील मुलांपेक्षा वेगळे नियम लागू करतात. मुलींनी मेहनत करुन मिळविलेल्या यशाने ते आनंद जाहीर करीत नाही तर फक्त ते त्यांच्या सामाजिक जीवनाबाबत जागरुक असतात.'' [1] (Harold & Andrea:1984:28) पौगंडावस्थेत मुलींच्या वर्तनात अनेकांगी स्वरुपाचे बदल झाल्यामुळे समाजात मुलां–मुलींमध्ये फरक केला जातो.

पौगंडावस्थेत मुलींमध्ये जे बदल होतात त्यामुळे त्यांच्या सामाजिकरणावर जास्त भर दिला जातो. या वयात त्यांना कुटुंबात, समाजात एवढेच नव्हे तर महाविद्यालयात सुद्धा लैंगिक भूमिकेमध्ये साकारले जाते. असे असले तरी महाविद्यालयीन जीवनात त्यांना बऱ्याच प्रमाणात स्वातंत्र्य लाभत असल्यामुळे त्याचाही ते उपभोग घेण्याचा प्रयत्न करतात. Dating व Courtship मध्ये त्यांना समवयस्क तरुण मित्रांमध्ये सहभागी व्हावेसे वाटते. लैंगिक बाबीसोबत लैंगिक शिक्षण व त्याबद्दलची माहिती त्यांना समवयस्क मित्रांकडूनच मिळते. हे ज्ञान विश्वस्त किंवा योग्य राहीलच असे नाही. काल्पनिकता व सत्य याचे मिश्रण त्यांच्या ज्ञानामध्ये तयार होते. परंतु वास्तविक ज्ञान व सत्य ज्ञान तरुण – तरुणींना मिळाले तर ते चांगले संबंध प्रस्थापित करु शकतात. काही वेळा समवयस्क व पालकांच्या संबंधामुळेही मुलांच्या विचारसरणीवर परिणाम होतो. समवयस्क व आई–वडीलांचे संबंध योग्य नसतील तर त्याचा परिणाम त्यांच्याशी संबधित सगळ्या घटकांवर होतो.

महाविद्यालयीन जीवनात बरेच तरुण–तरुणी प्रेमाराधनेत सहभागी होतात. या वयात आकर्षण, प्रियाराधना व प्रेम करणे या बाबी नेमक्या लिखित कथानकाप्रमाणे ते करतात. समाजात लैंगिक भूमिकांचे आदर्श हे युवक –युवतींसाठी फार कमी प्रमाणात असतात. तरुण युवक भारदस्त व मजबूत असतात. ते तरुणींना पुरुष असल्याची जाणीव करुन देतात.

'' पौगंडावस्थेत Dating पेक्षा लैंगिक खेळ जास्त महत्वाचे बनतात. सामाजिक स्तरावर Dating पेक्षा शारीरिक संबंधाला महत्व देऊन भावना उत्पन्न केल्या जातात. शारीरिक संबंधाला 'Necking and petting' मध्ये आलिंगन देणे, चुंबन घेणे, वस्त्रधारण केलेल्या

शरीराला प्रेमाने स्पर्ष करणे या बाबी केल्या जातात. या सगळ्या बाबी प्रेमासाठी व आनंदाची बाब म्हणून त्यांच्याकडून केल्या जातात.'' [2] (Wiley John & Son:1985:42-44) महाविद्यालयीन जीवनात त्यांचे प्रमुख लक्ष अध्ययन असायला पाहिजे. कारण त्यावरच त्यांच्या उज्ज्वल भविष्याची जडण–घडण अवलंबून असते. मात्र पौगंडावस्थेत होणाऱ्या बदलामुळे लैंगिक भावना प्रभावी झाल्याने, समवयस्क, विरुद्ध लिंगियाचा दबाव वाढल्यामुळे त्यांचे अध्ययनाकडे दुर्लक्ष होते. त्यांच्यावर सतत तणाव व दडपण आल्यासारखे त्यांना वाटते. यातूनच बहुतेकदा प्रयोग सुरु होतात. शरीररचना व प्रजोत्पादन प्रक्रियेची शास्त्रीय माहिती ते मित्रांकडून किंवा अश्लील साहित्यातूनही मिळविण्याचा प्रयत्न करतात. जर या वयात त्यांना योग्य व शास्त्रीय मार्गदर्शन मिळाले नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्वाला वेगळे वळण लागू शकते.लैंगिकता हा विषय इतर विषयासारखाच असूनही या विषयावर आपल्या समाजात, कुटुंबात उघडपणे चर्चा केली जात नाही. कारण हा विषय उघडपणे बोलण्यासारखा नाही अशी लोकांची धारणा असते. डॉ. राजन भोसले यांचे मते, लैंगिकतशी संबंधित प्रश्न विचारत असतांना मुलांच्या मनात कधीही लैंगिक भाव नसतात. लैंगिकतेबद्दल निषिध्दपणाची भावनाही त्याच्या मनात नसते. असते केवळ प्रांजळ असे कुतूहल. त्याला दडपल जाऊ नये. हे कुतूहल दडपल्या गेलं तर त्याची पूर्तता करण्यासाठी मुलं मग चुकीच्या माध्यमांचा अवलंब करतात''.[3] (Bhosale:2003:15) अनेक अध्ययनावरुन डॉ.जी. एम. ममतानी यांनी स्पष्ट केले की,'' युवक आपल्या लैंगिक उत्सुकतेपोटी नवनवीन युक्त्या स्वीकारायला तत्पर असतात. पारंपरिक सामाजिक मान्यता आणि मेंदूत येणाऱ्या लैंगिक आवेशाच्या द्वंद्वातून तरुण भ्रमित होऊन चुकीच्या मार्गाकडे वळत आहे. असे अनेक तरुण आहेत ज्यांच्या लैंगिक भावनेवर पुरेसे लक्ष न दिल्यामुळे किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे गंभीर परिणाम समोर येत आहे. आजही लैंगिक विषयावर चर्चा करणे असभ्यपणाचे मानले जाते. बहुतेक तरुणांना लैंगिकतेसंबंधी खरे ज्ञान नसल्यामुळे ते मित्र, चित्रपट, मासिके, ब्लूफिल्म, टी.व्ही. यामधून प्राप्त करतात. हे अर्धसत्य ज्ञान त्यांना पथभ्रष्ट करते.'' 4 (Mamtani:6) या मार्गाने मिळविलेली चुकीची व घातक माहिती यांच्या आधारे युवकांच्या भावी संबंधाची उभारणी होणं जर आपल्याला टाळायचे असेल तर पालकांनी सुजाणपणे मुलांच्या लैंगिक कुतूहलाच स्वागत करायला षिकले पाहिजे. डॉ. एम. एन. सिंह ने कहा है ''हम सैक्स अभिशाप तथा सैक्स निषेधात्मक रुढिगत समाज में रहते तथा बढे होते है, जो सांस्कृतिक, धार्मिक तथा नैतिक मूल्यों से भरा हुआ है | जो कि खुले तथा सुरक्षित रुप में सैक्स तथा सैक्सुअल बातोंपर विचार विमर्श करने का बहुत कम अवसर प्रदान करते है''| [5] (Singh:2004:200) प्रस्तुत अध्ययनात सुध्दा 69.3% उत्तरदाते लैंगिकतेविषयी आपल्या समाजात कुटुंबात उघडपणे बोलल्या जात नाही असे म्हणतात. ''पौगंडावस्थेत शारीरिक परिवर्नासोबतच मानसिक बदल सुद्धा घडून येतात. याचे परिणामी त्यांच्या वर्तनातही बदल घडून येणे स्वाभाविक आहे. पौगंडावस्थेतील युवकांना मोठ्यावर कमीतकमी अवलंबून राहण्याची गरज वाटू लागते. ते आपल्या मित्र मंडळीत व इतर वैचारिक विश्वात स्वातंत्र्य मिळवू पाहतात. पैागंडावस्थेतील युवकांना स्त्री व पुरुष असण्याच्या भूमिकेची, स्वतःच्या शरीराबाबत सकारात्मक दृष्टिकोनाची तसेच स्वत्व व अस्मितेची आत्यंतिक गरज भासते. या वयात इतरांनी त्यांच्याशी मोठ्या माणसासारखे वागावे असेही त्यांना वाटत असते. हे पौगंडावस्थेतील बदल असल्यामुळे त्यांच्या समोर वास्तव परिस्थिती व बेबंद वर्तणुकीमुळे होणारे घातक परिणाम मांडले तर ते जागरुकतेने व जबाबदारीने स्वतःच्या जीवनाबद्दल निर्णय घेऊ शकतील. पौगंडावस्थेतील तरुणांना त्यांच्या शारीरिक व लैंगिक वर्तणूकीसंदर्भात जबाबदार निर्णय घेण्यासाठी योग्य माहितीची व संदर्भाची गरज असते. म्हणूनच या कालावधीत तरुण–तरुणींना लैंगिकता हे काही विलक्षण शारीरिक साहस नसून परिपक्व भावनिक सहवासाच्या चौकटीतच त्यात समाधान मिळते हे हळूवारपणे समजावून सांगायला पाहिजे.''[6] (Salunke:29) या संदर्भात युवावर्गाला होणाऱ्या शारीरिक परिवर्तनाबाबत 'शास्त्रीय माहिती' नसते असे 67.7% उत्तदात्यांनी म्हटले आहे. त्यामुळेच 75.7% उत्तदात्यांनी अर्धवट मिळालेल्या ज्ञानातून मुलांमुलीमध्ये भीती, भ्रामक कल्पना, गैरसमज जोपासले जातात असे वाटते. पौगंडावस्था हा तसा वादळी अषांततेचा काळ. या वयात त्यांच्या मनात निर्माण झालेल्या लैंगिक विचारांना वाट करुन देणारा मित्रांसारखा दुसरा कोणी नसतो. मात्र डॉ विठ्ठल प्रभू म्हणतात, ''मित्र त्यांच्या इतकेच अज्ञानी असल्यामुळे चुकीची माहिती मिळण्याची शक्यता अधिक असते. त्यातून भीती, न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव, चिंता, वैफल्य, गैरसमज व भ्रामक कल्पना निर्माण होण्याची शक्यता असते. '' [7] (Prabhu:2005: 4) डॉ. प्रकाश कोठारी यांना अध्ययनातून असे आढळून आले की, "Indian youth are a confused lot on sex related matters largely because Indian society has not realized that sex eduction is the only way to vaccinate them from sexual diseases. Respondents were required to answer a standardised self-administered semi structured questionnaire, designed in consultation with experts on sex education".[8] (Sawant:1999)

पाश्चिमात्य संस्कृती व आधुनिकीकरणाचे परिणामी पौगंडावस्थेतील मुलांमुलीमध्ये Friendship Day, Birth day सारखे दिवस साजरे करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. शहरी समुदायातील मुलांमध्ये तर रात्री उशिरापर्यंत पार्टीमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण अलिकडे अधिक वाढलेले दिसते. मैत्री ही मनाची असते. प्रेमापेक्षा प्रामाणिकपणा अधिक महत्वाचा. मैत्री ही केवळ मैत्रीच्याच पायावर उभी राहायला पाहिजे. मात्र 'आला क्षण जगून घेतला पाहीजे' यासारख्या विचाराने तरुण पिढी विचार करु लागली आहे. या वयात लैंगिक इच्छा इतक्या तीव्र होतात की, केवळ शारीरिक पातळीवरचा आनंद वा समाधान पुरेसे आहे असे वाटू लागते. पौगंडास्थेत शरीराची वाढ पूर्ण होते हे खरे असले तरी मानसिक विकास व्हायचा असतो. पौगंडावस्थेत मुलांना 'Over night parties' चे आकर्षण अधिक असते. परिणामी ते कोणतेही धाडस करु शकतात असे 70.7% उत्तरदात्यांनी म्हटले आहे. सोबतच Rose Day, Valentine Day अशा प्रकारच्या दिवसांच्या निमित्ताने भिन्नलिंगी मित्रांमध्ये राहणे अधिक आवडते असेही 66.0% उत्तरदात्यांनी मत व्यक्त केले आहे. लैंगिकतेचा संबंध शारीरिक संबंधाशी नसून ती व्यापक अर्थाची संकल्पना असली तरी बहुसंख्य उत्तरदात्यांनी लैंगिकतेसंबंधीच्या कल्पना वारंवार बदलत असतात असे म्हटले आहे. मात्र बेजबाबदार लैंगिक वर्तनातून एच. आय. व्ही. ची लागण होऊ शकते याचे ज्ञान 83.0% उत्तरदात्यांना आहे. अमेरिकन समाजात एका अध्ययनात असे आढळले की,'' 80.0% मुलींनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर एकदा तरी लैंगिक संबंध स्थापन केले होते. '' [9] (Athar Shahid) या संदर्भात विठ्ठल प्रभू म्हणतात,'' व्यक्तिमत्व संपन्न व्हावे यासाठी संमिश्र समाजात मुलांमुलींनी एकत्र वावरणे

आवष्यक असते. मुलांमुलींनी प्रेमात पडले तरी लैंगिक संबंध ठेवू नयेत. यातून गर्भधारणा किंवा गुप्तरोग होण्याची शक्यता असते. शरीरसंबंध योग्य वयात, योग्य व्यक्तीशी, योग्य वेळी, जबाबदारीने म्हणजे विवाहानंतरच घडला पाहिजे.'' [10] (Prabhu :2005:84)

बलात्कार हे सुदृढ समाजाचे लक्षण नव्हे. दिवसेंदिवस समाजात बलात्काराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. याची कारणे अनेक आहेत. त्यामध्ये नीती व मूल्यांची भीती नसणे, आपल्या आनंदासाठी दुसऱ्याचा बळी घेण्याची स्वार्थी वृत्ती असणे, संभाव्य परिणामाची जाणीव नसणे या कारणांचा समावेष होतो. एवढे मात्र खरे की, बलात्कार हा सामाजिक व नैतिक अपराध असून त्याद्वारे S.T.D./Aid's चे प्रसरण होऊ शकते असे 80.0% उत्तरदात्यांनी मान्य केले आहे. असे असले तरी पौगंडावस्थेत विरुद्ध लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण होऊ शकते. हे आकर्षण प्रेम आहे असाही भास तरुणांना होतो. यासंदर्भात गोस्वामी भालचंद्र आचार्य म्हणतात,'' पुरुषांचे स्त्रीकडे व स्त्रीयांचे पुरुषांकडे आकर्षित होण्यामागे प्रमुख कारण त्यांची यौनप्रवृत्ती स्वयंसिद्ध तथ्थ आहे. म्हणून युवक आणि युवती यौन परिपक्वता प्राप्त केल्यावर एक दुसऱ्यांकडे आकर्षित होणारच. '' [11] (Goswami:2003:5) अध्ययनात 65.0% विद्यार्थी व 27.0% विद्यार्थिनी उत्तरदात्यांनी पौगंडावस्थेत विरुद्धलिंगी व्यक्तिबद्दल आकर्षण निर्माण होते असे म्हटले आहे. तसेच विरुद्ध लिंगी आकर्षणातून विचलित वर्तन होऊ शकते असे बहुसंख्य उत्तरदात्यांनी म्हटले आहे. वाढत्या वयात विरुद्ध लिंगी व्यक्तिबद्दल आकर्षण वा कुतूहल जागृत होणे हे नैसर्गिक असून ही तारुण्यात प्रवेष करतानाची व केल्याची आवश्यक अशी पायरी आहे. भिन्नलिंगी व्यक्तिबद्दल लैंगिक स्वप्नरंजन हे बहुतांष पौगंडावस्थेत केले जाते.

पौगंडावस्थेत लैंगिकतेचे विचार वारंवार मनात येणे स्वाभाविक असते. मात्र लहाणपणापासूनच सामाजिकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत योग्य–अयोग्य काय ? याचे संस्कार झालेले असल्यामुळे युवक साधारणपणे आत्मनियंत्रित होतात. असे असले तरी लैंगिकता नैसर्गिकरित्या आपला प्रभाव पाडीतच असते. संषोधनात 51.3% उत्तरदाते लैंगिकतेचा अनुभव घेण्यासाठी अनिर्बंधपणे व मनाला वाटेल त्याप्रमाणे वर्तन करण्याची इच्छा या वयात निर्माण होते असे म्हणतात. पौगंडावस्थेत शरीररचना व प्रजोत्पादन प्रक्रियेच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. ह्या प्रश्नांची सोडवणूक होणे आवश्यक आहे. डॉ. एम. एन. सिंह यांचे मते, '' सूचना का अधिकार आधारभूत अधिकार है। इसका यह तात्पर्य होगा की युवा लडके तथा लडकियों को सैक्स तथा सैक्स्युलिटी के विषय में जानने का अधिकार है। भारत की लगभग 56 प्रतिशत आबादी युवा लोगो की है, जो की जीवन के तथ्थों से लगातार अनभिज्ञ रहते है।''[12] (Singh:2004:202-211) प्रस्तुत अध्ययनात शरीररचना व प्रजोत्पादन प्रक्रियेच्या शास्त्रीय माहितीची गरज या वयात वाटते असे 87ण्3ः उत्तरदाते म्हणतात. यामध्ये विद्यार्थिनी उत्तरदात्यांचे प्रमाण 90. 1% आहे. पौगंडावस्थेत लैंगिक भावनांचा प्रभाव वाढल्यामुळे युवक बेचैन होतात. वास्तविक पाहता लैंगिक प्रेरणा हा जीवनाचा अर्थपूर्ण व आदरणीय भाग आहे. लैंगिक प्रेरणांना योग्य दिशा मिळायला हवी. नाही तर ते त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विघातक ठरु शकते. क्षिरसागर श्रीकृष्ण यांनी म्हटले की, '' केवळ तारुण्य आणि ध्येयशून्यता एवढ्या दोन कारणांनीही तरुण वयात मन बहकणे अगदी स्वाभाविक ठरते.''[13] (Shrikrishna:2003:130) प्रस्तुत अध्ययनात 84.7% उत्तरदाते पौगंडावस्थेत मनावर सतत तणाव व दडपण आल्यामुळे दैनंदिन अध्ययनावर त्याचा विपरीत परिणाम होतो असे म्हणतात. परिणामी या वयात लैंगिक भावनेसंबंधी आकर्षण निर्माण होऊन त्याबद्दल शोध व अनुभव घेण्याची प्रवृत्ती बळावते असे 65.3% उत्तरदाते म्हणतात. एका दुसऱ्या अध्ययनानुसार'' 40.0% स्त्रीया ज्या गर्भपातासाठी हेल्थक्लिनीकमध्ये येतात, त्या अविवाहित आणि 20 वर्षांपेक्षा कमी वयाच्या असतात.''[14] (Singh:2004:201) परिणामी 63ण्0ः तरुणांचा कल लैंगिक ज्ञान मिळविण्याकडे दिसून येतो. त्यांच्यात बलात्कार, अनौरस संतती, सेक्स, गर्भपात, प्रेम याविषयी माहीती मिळविण्याची उत्सुकता निर्माण होत असल्यामुळे त्यापैकी बरेच तरुण–तरुणी आपल्या मित्र–मैत्रिणीमध्ये यावर चर्चा करतात. अध्ययनात उत्तरदात्यांना कोणत्याही कारणांमुळे आलेल्या तणावाचे निरसन करण्यासाठी अंमली पदार्थाचा आधार घ्यावा असे वाटत नाही.

आपल्या समाजात लैंगिकता हा विषय इतर विषयासारखा चारचौघात बोलण्यासारखा नसल्यामुळे या विषयावरील शास्त्रीय स्वरुपाची माहीती तरुणांना मिळत नाही. शिवाय सामान्य शिक्षणात हा विषय सामाविष्ट नाही. लैंगिकता हा विषय अश्लिल समजला जातो. अध्ययनात लैंगिक विषयावरील माहितीसाठी अश्लिल साहीत्य मिळविण्याचा प्रयत्न 21.3% उत्तरदात्यांनी केला असल्याचे म्हटले आहे. भावना चाळविणे हाच अश्लिल साहित्याचा उद्देष असतो. "Pornography is generally considered to be written,visual or spoken material that 'shows or describes sexual acts or the genitals and is intended to be arousing to viewer".15 (Frank:1985)

लैंगिक शिक्षण जीवनासाठी आवश्यक असले तरी त्यांचा समावेश औपचारिक शिक्षणात नसल्यामुळे मित्रांनी सांगितलेल्या व प्रसारमाध्यमाद्धारे मिळणाऱ्या माहितीवर युवक–युवती अवलंबून असतात. बहुतांषी ही माहिती चुकीची किंवा अर्धसत्य असल्यामुळे या बाबतीत त्यांची जडणघडण चुकीच्या दिषेने होते. अध्ययनात 14.3% उत्तरदात्यांनी लैंगिक विषयावरील माहिती अपात्र व्यक्तींकडून मिळविण्याचा प्रयत्न केला होता. एका दुसऱ्या संषोधनात 49.0% मुलांना लैंगिकतेबद्दल माहिती मित्रांकडून, 21.0% मुलांना मासिकातून, फक्त 10.0% मुलांना ही माहिती पालक व शिक्षक यांच्याकडून प्राप्त होते.[16] (Sawant:1999:5)

निष्कर्ष :–

लैंगिकता व पौगंडावस्थेतील महाविद्यालयीन युवकांच्या वर्तणुकीतील बदल या संषोधन पेपरवरून पुढील ठळक निष्कर्ष निघतात.

1) लैंगिक विषयावर आपल्या समाजात व कुटुंबात बोलले जात नसल्यामुळे मित्र मैत्रिणींनी दिलेल्या अर्धवट ज्ञानातून भीती, गैरसमज व भ्रामक कल्पना जोपासल्या जातात.

2) लैंगिकतेचा अनुभव घेण्यासाठी अनिर्बंधपणे व मनाला वाटेल त्याप्रमाणे वर्तन करण्याची इच्छा निर्माण होते व सतत तणाव व दडपण आल्यामुळे दैनंदिन अध्ययनावर विपरित परिणाम होतो.

3) पौगंडावस्थेत लैंगिक भावना उद्दीपित झाल्याने त्याचा शोध व अनुभव घेण्याची प्रवृत्ती बळावते.

4) लैंगिक विषयासंबंधी कुतुहल वाटत असल्यामुळे बलात्कार, अनौरस संतती, गर्भपात यासारख्या विषयावर 50ण्0: उत्तरदाते मित्र मैत्रिणीमध्ये चर्चा करतात. परंतु ग्रामिण भागात सिनेमा, नेट, अश्लिल सिडी, अश्लिल पुस्तके सहजासहजी उपलध्द होत नसल्यामुळे यातून माहिती मिळविल्या जात नाही.

उपाययोजना :–

1) लैंगिक विषयावर आपल्या समाजात व कुटुंबात उघडपणे बोलल्या जात नाही. त्यामुळे युवकांमध्ये ज्या भ्रामक समजूती व गैरसमज निर्माण होतात त्या दूर करण्यासाठी औपचारिक शिक्षणातून लैंगिक विषय शिकविण्यात यावा.
2) पौगंडावस्थेत विरुद्ध लिंगी व्यक्तीच्या आकर्षणातून विचलित वर्तन घडून येवू नये याकरिता शरीररचना, लैंगिकता व प्रजोत्पादन प्रक्रियेची शास्त्रीय माहिती युवक–युवतींना देण्यात यावी.
3) लैंगिक विषयावरील अश्लिल माहिती मिळविण्यास प्रवृत्त होऊ नये याकरीता शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत लैंगिक शिक्षण देण्याची सुरुवात टप्याटप्याने करण्यात यावी.
4) पालक व विद्यार्थ्यांची लैंगिक शिक्षणाला अनुकूल मानसिकता घडविण्याचे दृष्टीने सामाजिक समुदेशकांनी भूमिका वठवावी.

संदर्भ सूची –

1) Harold Feldman I.And Andrea Parrot :- Human Sexuality (contemporary contro-versies) sage publication Beverly Hills/London New Delhi,1984 P.28
2) Willey John & Son:- All About adolescence C.G.D. Book A Wiley Medical Publication, New York, Toronto, Singapore. 1985 P. P. 42,44
3) डॉ. भोसले बा.राजन :– समग्र कामजीवन, मनोविकास प्रकाशन, चर्चगेट मुंबई, 2003 पृ. 15
4) डॉ. ममतानी जी. एम. :– यौन– पथ प्रदर्षिका सेक्ससंबंधी शास्त्रसंम्मत जानकारी, भ्रॉतिया, समस्याएं व निराकरण, जीकुमार प्रकाषन, नागपूर पृ. 6
5) डॉ. सिंह एम. एन :– एड्स तथा आधुनिक समाज, विवेक प्रकाशन, जवाहरनगर, दिल्ली, 2004 पृ.200
6) डॉ. साळूंखे सुभाष :– एड्स प्रतिबंध–शिक्षण, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई. पृ.29
7) डॉ. प्रभू विठ्ठल :– यौन ते विवाह (विवाहपूर्व मार्गदर्शन व लैंगिकता शिक्षण) मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. 2005 पृ.14
8) Sawant Anagha :- Youth Confused About Sex-Survey India Express News Papers (Bombay) Ltd.18 may 1999 www.indeanexpress.com
9) Athar Shahid :- Sex Education teenage Pregnancy, sex and Marriage Islamic Perspective, The more they know it - They More Do It, www.islamfortoday.com
10) डॉ. प्रभू विठ्ठल :– उपरोक्त पृ.83
11) गोस्वामी, भालचंद्र आचार्य 'प्रखर' :– व्यक्ती, परिवार और सेक्स एक समाजशास्त्रीय अध्ययन, जैना पब्लीशर्स, जयपूर 2003 पृ. 5
12) डॉ. सिंह एम.एन. :– उपरोक्त पृ. 202–211
13) डॉ. क्षिरसागर, श्रीकृष्ण के :– लैंगिक नीती आणि समाज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ.130
14) डॉ. सिंह. एम. एन. :– उपरोक्त पृ. 201
15) Magill N. Frank :- International Encyclopaedia of Sociology Volume-II, Shubhi Publication Sector 14, Gurgaon P.985
16) Sawant Anagha :- op. cit P.5

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org